# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## राज्यात ऑक्सीजन अभावी रुग्णांची गैरसोय अथवा मृत्यू होऊ नये यासाठी रुग्णालयात ऑक्सीजन साठा वाढविण्याबाबत

**(१) ४०१८७ (२४-०४-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड संसर्गाची तिसरी लाट नियंत्रणात असली तरी दैनंदिन कोविड रूग्णांची संख्या कमी झाली नसल्याने अचानक रूग्णांना अतिरिक्त ऑक्सीजनची गरज भासल्यास कृत्रिम ऑक्सीजनचा साठा वाढविण्याच्या सूचना आरोग्य विभागाने सर्व जिल्हयांच्या स्थानिक स्वराज्य संस्थाना दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात भविष्यात ऑक्सीजन अभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी तीस पेक्षा अधिक खाटा असलेल्या रुग्णालयांत प्राणवायूच्या टाक्या असणे बंधनकारक केली असल्याची बाब माहे जानेवारी,२०२२ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑक्सीजन अभावी रुग्णांची गैरसोय अथवा मृत्यू होऊ नये यासाठी ऑक्सीजन साठा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-०४-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) संचालनालयाच्या अधिनस्त रुग्णालयांमध्ये रुग्ण खाटांच्या क्षमते प्रमाणे ६ केएल (६ हजार किलो लिटर), १० केएल, १३ केएल व २० केएल इतक्या विविध क्षमतेच्या ऑक्सीजन टाक्या (प्लांन्ट) उभारण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त जम्बो सिलेंडर देखील उपलब्ध करुन देण्यात आले असल्याने सर्व संस्थांमध्ये पुरेशा प्रमाणात ऑक्सीजनचा साठा उपलब्ध आहे.

(४) लागू नाही

---

## नर्मदा काठावरील गावातील रुग्णांना बोट ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२) ४२२४७ (२४-०४-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धडगाव तालुक्यातील नर्मदा काठावरील गावातील नागरिकांच्या आरोग्यासाठी सुरु करण्यात आलेल्या तीन बोट ॲम्बुलन्स वरील कर्मचारी व ॲम्बुलन्स चालक यांना कमी वेतन व अपुऱ्या सुख सुविधांमुळे त्यांची पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दर आठवड्याला बोट ॲम्बुलन्स साठी १६० लिटर डिझेल खर्च होत असून या बोट ॲम्बुलन्स केवळ वाहतुकीसाठी वापरल्या जात असून आत्तापर्यंत किती रुग्णांना याचा लाभ झाला याची आकडेवारी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसचे, नागरिकांच्या उपयोगी असणाऱ्या या ॲम्बुलन्स अपुरी कर्मचारी वर्ग व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विनावापर असल्याने अनेक बेरोजगार तरुणांना नोकरीपासून वंचित राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले असल्याने जिल्हा प्रशासनाकडून कोविड काळामध्ये किती अम्बुलन्स घेण्यात आल्या व या ॲम्बुलन्स करता किती चालकांची नियुक्ती करण्यात आली आहे ,
(४) तसेच, नंदुरबार जिल्ह्यातील अक्राणी-धडगाव तालुक्यातील नर्मदा काठच्या अति दुर्गम गावांसाठी ४ ॲम्ब्युलन्स बोटींची सुविधा करण्यात आली असून त्यासाठी वैद्यकीय अधिकारी, एएनएम, चालक व मदतनीस यांची पदे मंजूर करण्यात आली असल्यास त्यांची पदनिहाय संख्या किती आहे, त्यापैकी किती पदे भरण्यात आली आहेत,
(५) असल्यास, या ॲम्ब्युलन्स बोटींचा आतापर्यंत किती रुग्णांनी लाभ घेतला याबाबतचा रेकॉर्ड ठेवण्याबाबत तसेच तेथे वैद्यकीय अधिकारी व वाहनचालक यांच्या नेमणुकीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सन २०१९-२० च्या मंजुर पीआयपी मध्ये बोट ॲम्ब्यूलन्स वरील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका, बोट चालक, औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ या कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ करण्यात आली आहे. तसेच, बोटीवर डबल शिफ्टमध्ये कामकाज होण्यासाठी दुप्पट कर्मचारी मंजुर करण्यात आलेले आहे. त्या करिता बोट ॲम्ब्यूलन्सवरील वैद्यकीय अधिकारी पदाचा भरतीसाठी दि.१४/०६/२०१९ रोजी जाहिरात देण्यात आलेली होती. सदर भरती प्रक्रियेत उमेदवार उपलब्ध झालेले नव्हते. परंतु, दि.२२/०४/२०२१ च्या भरती प्रक्रियेत तीनही बोट ॲम्ब्यूलन्सवर वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
एका आठवडयासाठी बोट ॲम्ब्यूलन्सच्या नियमित भेटी द्यावयाच्या कार्यक्षेता १६० लिटर डिझेल खर्च होत आहे. बोट ॲम्ब्यूलन्स वाहतुकीसाठी वापरल्या जात नसून बोट ॲम्ब्यूलन्सद्वारे सरदार सरोवरच्या बुडीत क्षेत्रात धडगाव व अक्कलकुवा तालुक्यात नियमित आरोग्य सुविधा पुरविण्यात येते.
(३) जिल्हा प्रशासनाकडून कोविड कालावधीमध्ये जिल्हा परिषद विभागाला एकूण २४ ॲम्ब्युलन्स देण्यात आल्या आहेत. नंदुरबार जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नियमित ३० वाहन चालक कार्यरत आहे व उर्वरित वाहन चालकाची रोजंदारी तत्वावर राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नेमणूक करण्यात आलेली आहे. नंदूरबार जिल्हयात एकूण ६० प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत त्या सर्व ठिकाणी ॲम्ब्युलन्स कार्यरत असून सर्व ॲम्ब्युलन्सवर चालकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. चालू असलेली एकही ॲम्ब्युलन्स विना वापर पडून नाही.
(४) नंदुरबार जिल्हयातील नर्मदा काठावरील अतिदुर्गम गावांसाठी ॲम्ब्युलन्स बोटीची सुविधा करण्यात आली असून सदर ॲम्ब्युलन्स बोट करिता वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्यसेविका, औषध निर्माण अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ, बोट चालक व खलाशी ही पदे मंजूर असून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) सन २०१९-२० च्या मंजूर PIP मध्ये बोट ॲम्ब्युलन्सवरील कर्मचारी यांच्या वेतनात वाढ करण्यात आलेली आहे. त्याकरिता बोट ॲम्ब्युलन्सवरील वैद्यकीय अधिकारी पदाच्या भरतीसाठी दि.१४.०६.२०१९ रोजी जाहिरात देण्यात आलेली होती.सदर भरतीप्रक्रियेत उमेदवार उपलब्ध झालेली नव्हते परंतु दि.२२.०४.२०२१ च्या भरती प्रक्रियेत तिन्ही बोट ॲम्ब्युलन्सवर वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**राज्यातील बालविवाह रोखण्यासाठी करावयाच्या कार्यवाही**

**(३) ४६०५० (०९-१०-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ आदिवासी भागात गेल्या तीन वर्षात १५ हजारांहून अधिक बालविवाह झाले असून त्यातील केवळ १५०० च्या आसपास बालविवाह रोखण्यात यश प्राप्त झाले असल्याचे शासनाने उच्च न्यायालयात सांगितले असता बालविवाहाचे कुपोषणा हे मुख्य कारण असावे असे मत सुनावणीवेळी न्यायालयाने व्यक्त केले असल्याची बाब माहे एप्रिल २०२२ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हात गेल्या वर्षभरात ५ बालविवाह झाल्याची नोंद झाली असल्याचे तसेच अहमदनगर जिल्हयात माहे, जानेवारी २०२० ते माहे, ऑगस्ट २०२१ पर्यत बालविवाहांच्या १८४ घटना घडल्या असल्याच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील बालविवाहाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी जिल्ह्याचा विभाग निहाय तयार केलेला कृती आराखडा एकत्रित करुन त्यांची सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला दिल्या असून सर्व विभागासाठी मानक कार्यपद्धती तयार करुन जिल्ह्यातील सर्व सरपंचांना बालविवाह निर्मूलन कायद्याची माहिती होण्यासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करावे, पालावर राहणा-या प्रत्येक मुलाला शाळेत प्रवेश द्यावा, तालुका स्तरावरील अधिका-याचे प्रशिक्षण घ्यावे, बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाद्वारे जनजागृतीचे कार्यक्रम तसेच जननी महिला सक्षम समाज अभियान राबवावेत अशा सूचना देखिल दिल्या आहेत, हे ही खरे काय,

(४) असल्यास, वातावरणातील बदलामुळे मुली-मुले वयात येणाचा कालावधी पुर्वीच्या कालावधी पेक्षा निम्म्याने कमी होत असतानाही केवळ बालविवाह झाल्याचे सर्वेक्षण काढण्यापेक्षा खाद्यपदार्थाची गुणवत्ता वाढवून स्वच्छ पाणी आणि सकस आहार कसा या महिला व नागरिकांना देण्यात येणार याचे सर्वेक्षण करण्याची गरज असतानाही याबाबत कोणतीही उपाययोजना न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, राज्यात बालविवाहाच्या घटना घडू नयेत यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासह अल्पवयीन आदिवासी मुलींना त्यांचे हक्क आणि बालविवाहाचे दुष्परिणाम याबाबत समुपदेशन करणे तसेच या मोहिमेत अंगणवाडी सेविका,आशा वर्कर, आणि ग्रामसेवकांचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०८-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

मा. उच्च न्यायालयाचा दि.१४/०३/२०२२ च्या आदेशानुसार आणि मा. ॲड. जनरल आणि मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या सहमतीने १६ आदिवासी जिल्ह्यातील बालविवाहाचे सर्वेक्षण करणेसाठी त्रिस्तरीय समिती नेमण्यात आली होती. या समितीने SAM, MAM आणि बालमृत्यू झालेल्या बालकाच्या मातांचा अभ्यास केला असून SAM, MAM आणि बालमृत्यु झालेल्या बालकांच्या १८ वर्षा खालील मातांची संख्या अनुक्रमे ३०००, ११६५२, ६०१ असे एकूण १५२५३ एवढी असल्याचे नमूद आहे.

(२) अंशतः खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या वर्षभरात ५ बालविवाह झाल्याची नोंद झाली आहे. तसेच अहमदनगर जिल्हयात जानेवारी २०२० ते ऑगस्ट २०२१ पर्यंत बालविवाहाच्या १८४ घटना घडल्या असल्याचे निदर्शनास आले हे खरे नसून

अहमदनगर जिल्ह्यात जानेवारी २०२० ते ऑगस्ट २०२१ पर्यंत एकूण ६० बालविवाह होत असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय अहमदनगर या कार्यालयास प्राप्त झाली होती. सदर ६० बालविवाह रोखण्यात आलेले आहेत.

(३) होय हे खरे आहे.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात बालविवाह निर्मूलन समिती गठित करण्यात आली असून जिल्ह्यातील शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, आरोग्य विभाग, पंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग या पाचही विभागांचा बालविवाह निर्मूलनासाठी विभागवार जिल्हा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो. तसेच गरोदर, स्तनदा माता यांच्यासाठी आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

(५) राज्यात ग्रामसेवकांना व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्त केले असून व त्यांना सहाय्य करण्यासाठी अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. बाल विवाह प्रतिबंध अधिनियमाच्या अनुषंगाने ग्राम बाल संरक्षण समितीच्या भूमिकेबाबतची माहिती देण्याच्या अनुषंगाने ग्राम बाल संरक्षण समिती सदस्य सचिव अंगणवाडी सेविका आणि सदस्य पोलीस पाटील यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. तसेच ३६ जिल्ह्यातील जिल्हा बाल संरक्षण कक्षातील कर्मचा-यांचे बाल विवाह प्रतिबंधासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या महिला व बालकल्याण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) ४६०९८ (०९-१०-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या महिला व बालकल्याण विभांगातर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांची पदे रिक्त असल्याचे माहे मे २०२२,मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदामुळे नागपूर जिल्हयातील कुपोषित मुलांची
संख्या मोठया प्रमाणात दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संवर्गनिहाय जिल्हयात असलेली रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०८-०६-२०२३) :**(१) अशंत: हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे रिक्त पद असलेल्या ठिकाणी लगतचे प्रकल्पातील बाल विकास प्रकल्प अधिकारी किंवा त्याच पंचायत समितीमधील सहाय्यक गट विकास अधिकारी किंवा त्याच प्रकल्पातील ज्येष्ठ पर्यवेक्षिका यांना बाल विकास प्रकल्प अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येतो, पर्यवेक्षीकेचे पद रिक्त असलेल्या क्षेत्राचा त्याच प्रकल्पातील लगतचे क्षेत्र असलेल्या पर्यवेक्षिकांना अतिरीक्त कार्यभार देण्यात येतो. तसेच, अंगणवाडी सेविकेचे पद रिक्त असलेल्या ठिकाणी त्या अंगणवाडीतील मदतनीसाला किंवा लगतच्या अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविकांना

अतिरीक्त प्रभार देण्यात येतो. त्यामुळे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना द्यावयाच्या सेवा नियमीतपणे देण्यात येत आहेत.
(३) व (४) रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**जव्हार (जि. पालघर) येथील अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या रिक्त पदांबाबत**

**(५) ४६२१२ (०९-१०-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि. पालघर) येथे दीर्घकाळापासून अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या जागा रिक्त असल्यामुळे शून्य ते सहा वर्ष वयोगटातील मुला मुलींच्या आरोग्याकडे, गरोदर मातांची माहिती संकलन करणे आदी कामांवर सध्या कार्यरत असलेल्या सेवक वर्गावर कामाचा ताण वाढत असल्याचे माहे मे, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांची किती पदे रिक्त आहेत तसेच त्यांना मानधन वेळेवर देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असलयास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०६-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२),(३) जव्हार (जि. पालघर) येथे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत २ प्रकल्प असून या प्रकल्पांमध्ये अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांच्या पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे:-

| पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| अंगणवाडी सेविका | २५८ | २५२ | ६ |
| अंगणवाडी मदतनिस | २५८ | २५० | ८ |
| मिनी अंगणवाडी सेविका | ८६ | ८२ | ४ |

राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ०९.०१.२०२३ अन्वये मान्यत देण्यात आली आहे. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन नियमितपणे अदा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खिर्डी खु (जि.जळगांव) येथील निंभोरा प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणारे आरोग्य उपकेंद्रामध्ये अस्वच्छतेचे प्रमाण वाढले असल्याबाबत**

**(६) ४७८९० (०९-११-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खिर्डी खु (जि.जळगांव) येथील निंभोरा प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणारे आरोग्य उपकेंद्रामध्ये अस्वच्छतेचे प्रमाण वाढले असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आरोग्य केंद्राच्या परिसरात काही ग्रामस्थ गुरे बांधत असल्याचे तसेच जनावरांचे शेण व उकीरडयांचे ढिगारे आरोग्य केंद्राच्या आवारात असल्याने याचा परीणाम आसपासच्या नागरिकांचे आरोग्यावर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
खिर्डी खु (जि.जळगांव) येथील निंभोरा प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत येणारे आरोग्य उपकेंद्राच्या आवारात कुठलेही प्रकारची अस्वच्छता नव्हती.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
खिर्डी खु (जि.जळगांव) येथे म. चेअरमन डिस्ट्रिक्ट बोर्ड पु. खा क्षेत्र ची १ हेक्टर ३८ आर एवढी जागा असुन त्यात २००० स्क्वेअर फुट मध्ये उपकेंदाची इमारत आहे. बोर्डाच्या उर्वरित रिकाम्या जागेत शेणाचे उकिरडे होते तसेच गुरे बांधण्यात येत होती. याबाबत ग्रामपंचायत खिर्डी खु यांना वारंवार तोंडी, लेखी सुचना देवुन सदर उकिरडे काढण्यात आले असुन गुरे बांधणे बंद करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(७) ४८१६३ (०४-११-२०२२). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचा-यांच्या संघटनाच्या शिष्टमंडळासोबत मा. महिला व बालविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनिसांना सेवानिवृत्ती योजनेच्या कक्षात आणि त्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्याचा सूचना मा.महिला व बालविकास मंत्री यांनी महिला व बालविकास विभागाच्या अधिका-यांना दिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे,
(४)असल्यास, सदर प्रस्तावानुसार एकूण किती वाढीव खर्च येणार आहे ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०६-०६-२०२३) :** (१), (२) , (३) व (४) अंगणवाडी कर्मचा-यांच्या विविध मागण्या संदर्भात अंगणवाडी कर्मचारी संघटना समवेत वेळोवेळी बैठक आयोजित करुन कार्यवाही करण्यात येते.
एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या मानधनामध्ये प्रतिमाह रुपये ८३२५/- वरुन रुपये १००००/- , अंगणवाडी मदतनीस यांच्या मानधनामध्ये प्रतिमाह रुपये ४४२५/- वरुन रुपये ५५००/- व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये प्रतिमाह रुपये ५९७५/- वरुन रुपये ७२००/- याप्रमाणे वाढ करण्याचा शासन निर्णय दिनांक ०३.०४.२०२३ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.

---

### राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८) ४९०३९ (०९-१०-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेत बाल विकास प्रकल्प अधिकारी, सहाय्यक बालविकास अधिकारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची सुमारे १८ हजार ८९७ पदे रिक्त असल्याचे सन २०२१-२०२२ च्या कार्यक्रम अंदाजपत्रकात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकात्मिक बालविकास सेवा योजनेसाठी सुमारे २ लाख १२ हजार ४३८ पदे मंजूर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकूण मंजूर पदांच्या पैकी रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०८-०६-२०२३) :** (१) व (२) सन २०२१-२२ च्या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका, अंगणवाडी मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका व अंगणवाडी सेविका इत्यादी
संवर्गांची मंजूर पदे २,१२,४३८ असून भरलेली पदे १,९३,५४१ असल्याचे नमूद केले आहे. त्यावरुन सन २०२१-२२ मध्ये रिक्त पदांची संख्या १८,८९७ असल्याचे दिसून येते.
(३) व (४) महिला व बाल विकास, शासन निर्णय, दि. ०९.०१.२०२३ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांची रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच, उर्वरित पदे भरण्याबाबत देखील कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात अर्भक व बालमृत्यूच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत,**

**(९) ५००६७ (२१-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुमारे २३ हजार अर्भक व बालमृत्यू हे माहे जानेवारी,२०२१ ते माहे जुन,२०२२ अखेर या कालावधीत झालेले असल्याची माहिती माहे जुलै,२०२२ च्या शेवटच्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले
(३) असल्यास, त्यानुसार राज्यात वाढत असलेली अर्भक व बालमृत्यूची समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणतया उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०६-२०२३) : (**१) हे खरे आहे.
माहे जाने,२०२१ ते माहे जुन २०२२ या कालावधीत राज्यात ० ते ५ वयोगटातील एकूण २४२६६ बालमृत्यू झाल्याची नोंद आहे.
(२) दरमहा आढावा घेण्यात येवून जिल्हा स्तरावर दरमहा घेण्यात येणाऱ्या बालमृत्यू अन्वेषण अहवालानुसार राज्यातील बालमृत्यू हे Sepsis, Pneumonia, prematurity and LBW, Sudden Infant Death, Congenital malformation, Respiratory distress या वैद्यकीय कारणांमुळे झालेले आहेत.
(३) राज्यात नवजात शिशु मृत्यू दर (० ते २८ दिवस), अर्भक मृत्यू दर (० ते १ वर्ष) व बालमृत्यू दर (० ते ५ वर्ष ) हे सुध्दा कमी होत आहे. SRS २०२० नुसार हे दर अनुक्रमे ११,१६,१८ आहेत.
आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी शासनामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत खालील योजना राबविण्यात येतात.
(१) आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (SNCU) (२) नवजात शिशु स्थिरीकरणकक्ष (NBSU) (३) बाल उपचार केंद्र (CTC) (४) पोषण पुर्नवसन केंद्र (NRC) (५) घरच्या घरी नवजात शिशुची काळजी (HBNC) (६) घरच्या घरी लहान बाळाची काळजी (HBYC) (७) Mother Absolute Affection (MAA) (८) राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (९) ॲनिमिया मुक्त भारत (१०) जननी सुरक्षा योजना (JSY) (११) जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK) (१२) मानव विकास कार्यक्रम (१३) प्रधान मंत्री मातृवंदना योजना (PMMVY) (१४) प्रधान मंत्री सुरक्षित मातृत्व अभियान (१५) नवसंजीवनी योजना.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**सायखेडा (ता.निफाड, जि.नाशिक) येथे नवीन ग्रामीण रुग्णालय स्थापन करणेस मंजुरी मिळणेबाबत**

**(१०) ५०३३८ (१८-०१-२०२३). श्री.दिलीप राव बनकर (निफाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायखेडा (ता.निफाड, जि.नाशिक) येथे विशेष बाब म्हणून ग्रामीण रुग्णालय स्थापन करावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२ )असल्यास, त्या अनुषंगाने आरोग्य विभागाने प्रस्ताव मंजुरी करीता शासनाकडे सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सायखेडा येथे विशेष बाब म्हणून ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०६-०६-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि. बीड.) येथे वृद्धत्व व मानसिक आजार केंद्राचे वाढीव खाटांचे रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(११) ५०८२१ (१८-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे आरोग्य विभागामार्फत मराठवाडा विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २००८ मध्ये २०० खाटांचे वृद्धोपचार व मनोविकार केंद्र बांधण्याचा निर्णय घेतल्यानुसार येथे पहिल्या टप्यात राज्यातील पहिले १०० खाटांचे वृद्धत्व व मानसिक आजार केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेऊन कार्यान्वित करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी पहिल्या टप्यातील कामानंतर दुसऱ्या टप्यातील १०० खाटांचे रुग्णालय सुरु करून त्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग व इतर सुविधा देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यांचेकडे दिनांक २९ जूलै, २०२२ व मा.आरोग्य मंत्री यांचेकडे दिनांक २० ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्यासुमारास तसेच आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने सहसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी दुसऱ्या टप्यातील १०० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री व साधन सामग्रीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत उप संचालक, आरोग्य सेवा, लातूर यांना कळवले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने दुसऱ्या टप्यातील वाढीव १०० खाटांच्या रुग्णालयास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०३-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २५.१०.२००७ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत मराठवाडा विकास कालबध्द कार्यक्रम अंतर्गत अंबेजोगाई जवळील मौजे लोखंडी सावरगाव येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या खालील योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता.

१) स्त्री रुग्णालय २) परिचर्या प्रशिक्षण केंद्र ३) वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र.

दिनांक ०८.०२.२००८ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा विकास कालबध्द कार्यक्रम २००८-२००९ व २००९-२०१० अंतर्गत बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई जि.बीड येथे राज्यातील पहिले वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्राची स्थापना करण्यास तत्वत: मंजूरी देण्यात आली होती.

त्यानुषंगाने पहिल्या टप्प्यात १०० खाटांसाठी आवश्यक असणाऱ्या १२९ पदांना दिनांक ०६.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली.

(२) व (३) होय.

(४) दुसऱ्या टप्प्यातील वाढीव १०० खाटांच्या रुग्णालयास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयास दिनांक १९.१२.२०२२ रोजी प्राप्त झालेला असून सदर प्रस्ताव शासनास प्राप्त होताच त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील देवदासी प्रथा बंद करण्याबाबत**

**(१२) ५०९३५ (२०-०१-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात देवदासी प्रथेला कायद्याने बंदी असताना महाराष्ट्र, कर्नाटकसह सहा राज्यातील विविध मंदिरात महिलांना देवदासी बनविणे ही कूप्रथा अद्यापपर्यंत सुरू असल्याने राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने या राज्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिलांना देवदासी बनवणे ही कुप्रथा बंद करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०७-०६-२०२३) :**(१) होय,

(२) व (३) महाराष्ट्र शासनाने देवदासी प्रथा (नाहिशी करणे) अधिनियम २००५ हा दिनांक ३१.०३.२००८ पासून राज्यात लागू केलेला आहे. त्यानुसार मुली/महिलांना देवदासी म्हणून समर्पीत करण्यास बंदी आहे.

देवदासी प्रथा (नाहिशी करणे) अधिनियम २००५ पारीत होण्यापूर्वी महाराष्ट्रात प्रामुख्याने कर्नाटक राज्यालगतच्या जिल्हयांमध्ये म्हणजेच कोल्हापूर परिक्षेत्रातील जिल्हयांमध्ये देवदासी आढळून येत होत्या. सद्यस्थितीत सन २००८ नंतर देवदासी बनविण्याच्या/ झाल्याच्या कोणत्याही घटनांची नोंद पोलीस विभागाकडे झालेली नसल्याबाबत विशेष पोलीस महानिरिक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांनी त्यांच्या दि.०२.११.२०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे. याबाबतचा अहवाल शासनाच्या दि.२४.११.२०२२ च्या पत्रान्वये राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आला आहे.

---

**अंगणवाडीतील बालकांना दर्जेदार आहार पूरवठा करण्याबाबत**

**(१३) ५१४२३ (२६-१२-२०२२). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील सुमारे ६० टक्के अंगणवाडयांमध्ये निकृष्ट पोषण आहार वाटप करण्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या दुस-या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून येथील अंगणवाडी सेविकांनी ही समस्या प्रशासनाकडे मांडली असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत चालणा-या अंगणवाडी केंद्रावर तीन ते सहा वर्षे वयोगटातील सुमारे २० हजार बालकांना पोषण आहार दिला जात असून या केंद्राना दिनांक १५ मे ते १५ सप्टेंबर, २०२२ असे ४ महिन्यांचे पोषण आहाराचे साहित्य अगोदरच देण्यात आले असून यातील तीन महिन्यांचे साहित्य हे न शिजविता वाटप करण्यास सांगण्यात आले व एक महिना पोषण आहार शिजवून वाटप केले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत तालुक्यातील अंगणवाड्यांमध्ये बालकांना गरम ताजा सकस आहार देण्यासाठी शासनाकडून पुरविण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अंगणवाडी केंद्राना इंधन साहित्य देण्यात आले नाही तसेच सुमारे ६० टक्के अंगणवाडयांमध्ये निकृष्ट पोषण आहार देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन अंगणवाडयांना दर्जेदार आहार पूरवठा व इंधन साहित्य देण्यासह निकृष्ट पोषण आहाराचा पुरवठा करणा-या पुरवठादारांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२० -०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर प्रकल्पातील १८ व सावनेर प्रकल्पातील ३३ असे एकूण ५१ अंगणवाडी केंद्रामध्ये चना व वाटाणा खराब पूरवठा झाल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने खबरदारीचा उपाय म्हणून सदर पुरवठा बदलून घेण्यात आला. तसेच त्या कालावधीत प्राप्त झालेले कच्चे धान्य व किराणामालाचे नमुने प्रादेशिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नागपूर या शासकीय प्रयोगशाळेला तपासणी करिता पाठविण्यात आले असता, सदर नमुने योग्य असल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे.
(२) हे खरे नाही.

वर्धा जिल्ह्यात अंगणवाडी सेविकांनी आहार शिजवण्यास नकार दिल्यामुळे आहारामध्ये खंड पडू नये म्हणून दि.१६.०५.२०२२ ते दि.१५.०७.२०२२ या कालावधीमध्ये जेवढया दिवसांचा गरम ताजा आहार पूरवठा होऊ शकला नाही तेवढया कालावधीकरीता गरम ताजा आहाराऐवजी कच्चे धान्य व किराणा मालाचा घरपोच पूरवठा अंगणवाडी सेविका व मदतनिस यांचेमार्फत करण्यात आलेला आहे. दि.१६.०७.२०२२ पासून नियमितपणे गरम ताजा आहाराचा पुरवठा सुरु आहे.
(३), (४) व (५) पालघर जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय मनोर मधील एका अंगणवाडीमध्ये चणा खराब मिळाल्याची बातमी दि.२१.१०.२०२२ रोजी दैनिक लोकसत्ता मध्ये प्रकाशित झाली होती. सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी झालेली असून चौकशी अंती चांगल्या प्रतीचा आहार पुरवठा होत असून अंगणवाडी सेविकांनी आहार शिजवण्यसासाठी इंधन खर्च प्रति लाभार्थी ६५ पैसे प्रमाणे रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे व सदर रक्कम अंगणवाडी सेविकांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील मेळघाटमधील कुपोषण रोखण्यासाठी आरोग्य कर्मचारी व डॉक्टर यांना प्रोत्साहन देण्याबाबत

**(१४) ५१९४८ (२१-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोगदी (ता.धरणी, जि.अमरावती) येथील पुरब भिलावेकर यांचे दोन वर्ष वय असताना त्यास कुपोषण, सिकलसेल आणि क्षयरोगाने ग्रासले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक आरोग्य कर्मचारी व डॉक्टरांनी योग्य उपचार करुन त्याची तब्बेत बरी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यावरुन असे निदर्शनास येते की जर आरोग्य कर्मचाऱ्यांनी मनावर घेतले तर मेळघाटात बालमृत्यू होणार नसल्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन मेळघाटातील कुपोषण रोखण्यासाठी आरोग्य कर्मचारी व डॉक्टर यांना प्रोत्साहन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
पुरब भिलावेकर,वय वर्ष २ मोगर्दा,ता.धारणी,या बालकाला क्षयरोगाचे निदान झाले होते.तो सिकलसेल वाहक असून सप्टेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ पर्यंत SAM श्रेणी मध्ये होता.
(२) हे खरे आहे.
स्थानिक आरोग्य कर्मचारी व डॉक्टरांनी बालकावर २६.०४.२०२२ पासून १०.१०.२०२२ पर्यंत क्षयरोगाचे यशस्वी उपचार केले असून बालक रोग मुक्त होईपर्यंत पोषण आहारासाठी रू.५००/- प्रती महिना प्रमाणे ६ महिन्याकरिता रू.३०००/- व एका वेळचा आदिवासी भत्ता रू.७५०/- देण्यात आलेला आहे.सदर बालक सप्टेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ पर्यंत SAM,माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये MAM श्रेणी ,मार्च २०२२ पासून ते जून २०२२ पर्यंत SAM श्रेणी,जुलै २०२२ पासून ऑगस्ट २०२२ पर्यंत MAM श्रेणी मध्ये आला आहे.माहे मे २०२२ मध्ये CTC मध्ये १५ दिवस उपचार देऊन आज रोजी प्रकृती चांगली आहे.
(३) मेळघाट मधील अधिकारी कर्मचारी यांच्या सतत पाठपुराव्याने मेळघाट मधील बालमृत्यू,उपजतमृत्यू,मातामृत्यू दरामध्ये दरवर्षी घट झाल्याचे दिसून येते,बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.
(४) हे खरे आहे.
मेळघाट भागात काम करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना १ स्तर वरची वेतन श्रेणी देण्यात येते. तसेच पगाराव्यतिरिक्त दरमहा खालीलप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो
आरोग्य सेविका -रू.१०,०००/-
आरोग्य सहायिका-रू.१५,०००/-
वैद्यकीय अधिकारी गट अ-रु.३५,०००/-
वैद्यकीय अधिकारी गट ब-रू.२५,०००/-
विशेषतज्ञ (स्थायी)-रु.५०,०००/-
प्रतिनियुक्तीवर तज्ञ (१५ दिवसांकरिता)-रु २५,०००/-
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**नांदेड जिल्ह्यातील कंत्राटी आरोग्य सेविकांना कार्यमुक्त केल्याबाबत**

**(१५) ५४५६० (२१-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेमध्ये कंत्राटी पद्धतीवर मागील जवळपास दहा ते पंधरा वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या आरोग्य सेविकांना कार्यमुक्त करण्याचा निर्णय केंद्र शासना पाठोपाठ राज्य शासनाने देखील घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील एकूण ३७ कंत्राटी आरोग्य सेविकांना माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कामावरून कार्यमूक्त करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दुर्गम ग्रामीण भागात मागील दहा ते पंधरा वर्षे तसेच कोरोना सारख्या कठीण काळात सेवा देणाऱ्या व अतिशय कमी मानधनावर कार्यरत असणाऱ्या आरोग्य सेविकांना कार्यमूक्त केल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा व जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२१-०४-२०२३) :**(१) हे खरे आहे,
(२) हे खरे आहे,
(३) हे खरे आहे,
(४) केंद्र शासनाने ५९७ आरोग्य सेविकांच्या पदांना मंजुरी दिली असल्यामुळे कार्यमुक्त व इतर ठिकाणी समायोजित करण्यात आलेल्या आरोग्य सेविकांना मुळ जागी रुजू करुन घ्यावे असे दि.२०/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हयांना कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील बुटीबोरी एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीत राज्य कामगार विमा योजनेद्वारे (ईएसआयएस) रुग्णालाचे बांधकाम पूर्ण करुन ते कार्यान्वित करण्याबबात**

**(१६) ५५०२४ (२२-०१-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील बुटीबोरी एम.आय.डी.सी. औद्योगिक वसाहतीत सन २०१८ मध्ये राज्य कामगार विमा योजनेद्वारे (ईएसआयएस) २०० खाटांचे रुग्णालय चार वर्षापूर्वी मंजूर झाले असून अद्याप बांधकाम पूर्ण झाले नसल्याचे दिनांक २२ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुगणालय कामगाराच्या हिताचे असल्याने रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करुन ते कार्यान्वित करण्याबबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०२-०६-२०२३) :**(१)हे अंशत: खरे आहे.
बुटीबोरी ,जि.नागपूर येथे राकावि महामंडळ, श्रम मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मार्फत राज्य कामगार विमा योजनेंतर्गत २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येत आहे. सदर रुग्णालयाच्या बांधकामाकरिता आवश्यक "ना-हरकत प्रमाणपत्रे" (उदा.MPCB NOC, MIDC FIRE NOC, Tree Cutting NOC) व परवानग्या (उदा.MIDC कडून Building Plan Approval(FSI) व बांधकाम सुरु करावयाची परवानगी इ. घेण्याची कार्यवाही करण्यात आली असून सन २०१८ मध्ये सदर रुग्णालयाचे भूमीपूजन करण्यात आले आहे. तसेच दि.१४.१२.२०२२ पासून सदर रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे.
(२) सदर रुग्णालयाच्या बांधकामाकरिता विविध विभागांकडून आवश्यक "ना-हरकत प्रमाणपत्रे" व परवानग्या घेण्यात आल्या असून सदर रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर( जि.बुलढाणा) येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(१७) ५५७४८ (१८-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मलकापूर (जि. बुलढाणा) येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये डॉक्टर व कर्मचारी सतत गैरहजर रहात असून काही महिला डॉक्टर प्रसुती रजा संपून सुद्धा त्या अजूनही प्रसुती रजेवर असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२, मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२)असल्यास, डॉक्टर व कर्मचारी याच्या सतत गैरहजरीमुळे रुग्णांना उपचार मिळण्यास विलंब होत असल्याने त्यांना नाईलाजाने खाजगी रुग्णांलयामध्ये उपचारासाठी जावे लागते,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयातील संबंधित डॉक्टर व कर्मचा-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०६-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

(२) रूग्णालयात उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांच्या ड्युट्या सुरळीतपणे लावून रूग्णांना वेळेत सेवा दिली जात आहे.

(३) दीर्घकालीन रजेवर असलेल्या तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विरार पूर्व मौजे सत्पाळा (ता.वसई,जि.पालघर) येथील संत मदर तेरेसा रुग्णालय अवैधरित्या सुरु असल्याबाबत**

**(१८) ५६७४६ (२८-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार पूर्व मौजे सत्पाळा (ता.वसई,जि.पालघर) येथील सर्वे क्रमांक ०६ हिस्सा क्रमांक ०१ या मिळकतीवर संत मदर तेरेसा हे मल्टिस्पेशालिस्ट रुग्णालय अवैधरीत्या सुरु असून सदर इमारतीस वसई-विरार शहर महानगरपालिका प्रशासनाने दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये परवानगी नाकारली असून सदर रुग्णालयास जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांच्या कार्यालयाकडून नजरचुकीने परवाना दिल्याचे सिद्ध झाल्यामुळे सदरची नोंदणी जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांनी दिनांक २३ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये रद्द केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे बेकायदा रुग्णालय तात्काळ सीलबंद करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्याने दिनांक १८ जुलै २०२२ रोजी व त्यासुमारास मा. मुख्यमंत्री आणि शासनाच्या सर्व संबंधित विभागाकडे केली , हे ही खरे आहे काय,

(३) तसेच , हे मल्टिस्पेशालिस्ट रुग्णालय अवैधरीत्या सुरु असल्याची बाब प्रहार जनशक्ती पक्षाच्या पालघर जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ आणि दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचे बेकायदा रुग्णालय २१ दिवसात बंद न केल्यास सीलबंद करण्याची नोटीस जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास रुग्णालय व्यवस्थापनास दिली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या स्वरूपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०६-२०२३) :**(१) (२) (३) (४) हे खरे आहे.
(५) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे याचिका क्र. १४१८/२०२३ दाखल असून सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात टीबी रुग्णालयात डॉक्टरांची कमतरता निर्माण झाली असल्याबाबत**

**(१९) ५६७६० (२८-०४-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात टीबी या वेगाने फैलणा-या आजारावर वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी तरुण डॉक्टर फारसे उत्सूक नसल्याने या आजाराच्या रुग्णांवर वैद्यकीय उपचार करणाऱ्या डॉक्टरांची कमतरता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईस्थित वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी टीबी रुग्णालयामध्ये इंटर्नशिप केली नसल्याचे उपलब्ध माहिती वरून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना किंवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२१-०६-२०२३) :**(१) व (२) खरे नाही.

सद्यस्थितीत राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या परवानगीने एकूण १० शासकीय / महानगरपालिका महाविद्यालयांमध्ये ३९ विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह एम.डी.चेस्ट अँड टीबी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील क्षयरोग विभागाकरिता प्रत्येकी एक वरिष्ठ निवासी डॉक्टरचे पद मंजूर करण्यात आलेले आहे.

तसेच, वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या नियमानुसार वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्नित असलेल्या रूग्णालयांमध्ये १२ महिन्यांचे आंतरवासिता प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक असून त्यानुसार एक आठवडयाकरिता प्रत्येक आंतरवासिता प्रशिक्षणार्थीची क्षयरोगशास्त्र विभागात रूग्ण सेवेकरीता नियुक्ती करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनाथ मुलींना अनाथ प्रवर्गातून शासन सेवेत राखीव जागा देण्याबाबत**

**(२०) ५७४९१ (२८-०४-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ओपन, ओ.बी.सी., एस.टी., एस.सी या प्रवर्गातील अनाथ मुलींना शासकीय सेवेते राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे त्याच धर्तीवर अनाथ मुलींना अनाथ प्रवर्गातून राखीव जागा देणेबाबतची मागणी माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनाथ मुलींना स्वतःचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले असून या मुलींची लग्न करण्यासाठी चांगल्या कुटुंबातील लोक धजावत नसल्याने तसेच उदाहरनिर्वासाठी योग्य मार्ग नसल्याने चुकीच्या मार्गाला जावे लागत असल्यामुळे अनाथ मुलींच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार अनाथ मुलींना न्याय मिळावा, आत्महत्यांचे प्रमाण कमी व्हावे, त्यांना त्यांचे जीवन स्वाभिमानाने जगता यावे याकरीता त्यांना शासन सेवेत सेवा करता यावी म्हणून त्यांना अनाथ प्रवर्गातून राखीव जागा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०६-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. याबाबतची कोणतीही तक्रार/ माहिती/ निवेदन/ बातमी प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडी केंद्रातील खंडित वीज पूरवठा पूर्ववत करण्याबाबत**

**(२१) ५७६७१ (२८-०४-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंगणवाडी केंद्राकडे महावितरणच्या वीज बिलापोटी रक्कम थकीत असून ९४८८६ अंगणवाडयांपैकी केवळ ३०९५८ अंगणवाडयामध्ये विज पुरवठा असून ६३९२८ अंगणवाडयात विजपुरवठाच नसल्याची बाब माहे जानेवारी,२०२३ च्या पहिल्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील १८ अंगणवाडी केंद्राकडे महावितरणचे सुमारे १ लाख ४४ हजार २६ रुपयांची वीज देयके थकीत असून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी क्षेत्रात २६४६ अंगणवाडी कार्यरत असून त्यापैकी १४७६ अंगणवाडया मध्ये वीजपुरवठा सुर असून उर्वरीत ११७० अंगणवाडया अंधारात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी केंद्राची वीज देयके न भरल्याने वीज पुरवठा खंडित करून विजेचे मीटर काढण्यात आल्याने या अंगणवाड्या अंधरात आहेत , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा प्रशासनाकडे विज देयकाकरिता निधींची तरतूदच नसल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,बालकांच्या शैक्षणिक व पोषणाच्या सुविधेसाठी राज्यातील अंगणवाडयामध्ये वीज देयका करीता निधीची तरतूद करण्यासह खंडित वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०७-०६-२०२३) :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत राज्यात ग्रामीण प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रापैकी ७०८७९ अंगणवाडया स्वमालकीच्या इमारतीत कार्यरत असून त्यापैकी ३३९०१ अंगणवाडी केंद्रामध्ये वीजेची सोय आहे. उर्वरित ३६९७८ अंगणवाडी केंद्रांना वीज सुविधा उपलब्ध नाही.

(२) वाशिम जिल्हयातील सदर १८ अंगणवाडी केंद्रांपैकी एकूण ७ अंगणवाडी केंद्रांवर सद्यस्थितीत विद्युत पुरवठा सुरळीत सुरु असुन ६ अंगणवाडी केंद्रावरील विद्युत पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात आलेला आहे. तसेच उर्वरीत ५ अंगणवाडी केंद्रांचे वीज पुरवठा खंडीत करुन वीज मिटर काढण्यात आलेले आहेत.

(३), (४), (५) व (६) सदर अंगणवाडी केंद्रांना ग्रामपंचायत मार्फत सदरहु विद्युत जोडणी करुन देण्यात आलेली असून वीज देयकसुध्दा ग्रामपंचायत मार्फत अदा करण्यात येत होते. परंतू मागील काही कालावधीमध्ये ग्रामपंचायतींनी संबंधित अंगणवाडी केंद्रांचे विद्युत देयक अदा केले नाही. त्यामुळे सर्व संबंधित ग्रामपंचायतींना क्षेत्रिय कार्यालयामार्फत सदरहु देयक अदा करुन वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

---

**राज्यात कोरोना लसीचा पहिला, दुसरा व बुस्टर डोस नागरीकांना देण्याच्या अनुषंगाने करावयाची उपाययोजना**

**(२२) ५७८५५ (२८-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना लसीचा पहिला, दुसरा व बुस्टर डोस माहे डिसेंबर, २०२२ अखरे पर्यत किती नागरीकांनी घेतला आहे,

(२) असल्यास, परभणी जिल्ह्यात केवळ ६ टक्के नागरीकांनीच बुस्टर डोस घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यात कोरोनावरील लसीचे तीन्ही डोस सर्व नागरीकांना देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०६-२०२३) :** (१) राज्यात माहे डिसेंबर २२ अखेर नागरीकांनी कोविड १९ लसीचा ९,१६,५०,६०९ नागरीकांनी पहिला डोस, ७,६५,६४,९३८ नागरीकांनी दुसरा डोस व ९४,९१,८७१ नागरीकांनी प्रिकॉशन (बुस्टर) डोस घेतला आहे.

(२) व (३) परभणी जिल्हयात माहे डिसेंबर २२ अखेर ९८,२३६ नागरीकांनी प्रिकॉशन (बुस्टर) डोस घेतला आहे. नागरीकांमध्ये प्रिकॉशन (बुस्टर) डोस घेण्याबाबत असलेली उदासिनता तसेच कोविड- १९ आजाराबाबत नागरीकांमध्ये कमी झालेली भीती यामुळे प्रिकॉशन (बुस्टर) डोस घेतल्याचे प्रमाण कमी आहे.

(४) राज्यात सर्व नागरीकांनी कोविड १९ लसीचे डोस घेण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे -

१) सुक्ष्मकृती नियोजन आराखडयाच्या मदतीने लसीकरण सत्राचे आयोजन व अंमलबजावणी.

२) घरोघरी ए.एन.एम, एम.पी.डब्ल्यू, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्ती यांच्याद्वारे घरभेटी देऊन कोविड लसीकरणासाठी पाठपुरावा.

३) लाभार्थ्यांसाठी सत्रांचे आयोजन सोईच्यावेळी करणे.

४) कोविन प्रणालीच्या सहाय्याने डयूलीस्टचा वापर.

५) व्यापक प्रमाणात लसीकरणाची प्रसिध्दी तसेच सोशलमिडियाचा वापर करून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लसीकरणासाठी प्रवृत्त करणे.

६) इतर शासकीय विभागांचा कोविड १९ लसीकरणात सहभाग.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**कळबणी बु (ता.खेड,जि.रत्नागिरी) येथिल उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य सोयी-सुविधा पुरविण्यासह कर्मचारी वर्गाची पदे भरण्याबाबत**

**(२३) ५८०३६ (२८-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळबणी बु (ता.खेड,जि.रत्नागिरी) येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी व अन्य कर्मचारी वर्गाची अपुरी पदे असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपु-या आरोग्य सुविधा व कर्मचारी वर्गामुळे रुग्णांची गैरसोय होत असून त्यांना खाजगी दवाखान्यात उपचाराकरीता जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयात वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी वर्गाची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय.त्यानुसार सदर रुग्णालयात आरोग्य सोयी-सुविधा पुरविण्यासह कर्मचारी वर्गाची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०६-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय कळवणी बु (ता.खेड जि.रत्नागिरी) येथे गट अ ते ड संवर्गाची एकुण ९२ पदे मंजुर असुन ४२ पदे भरलेली व ५० पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) वैदयकिय अधिक्षक पद सेवानिवृत्तीमुळे दि. ३०-६-२०२१ पासून रिक्त झाले आहे. वैदयकीय अधिकारी गट अ (एस-२०),गट क व ड संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) होय,

वैद्यकीय अधिक्षक पदाचा प्रभारी कार्यभार उपजिल्हा रुग्णालय दापोली येथील वैदयकिय अधिकारी, गट-अ यांचेकडे देण्यात आला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्याची एकुण १५ पदे मंजुर असुन त्यापैकी ५ पदे भरलेली आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत एकुण ५ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असुन त्यापैकी ३ विशेषज्ञ आहेत. सदर रुग्णालयात कार्यरत असलेले नियमित व कंत्राटी वैदयकिय अधिकारी, कर्मचारी हे उपलब्ध साधन सामुग्री यांचा आवश्यकतेनुसार वापर करुन रुग्णांना तात्काळ व विनातक्रार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देत आहेत व रुग्णसेवेमध्ये कोणतीही अडचण येऊ दिली जात नाही.

तसेच वैदयकीय अधिकारी गट अ (एस-२०), गट क व ड संवर्गाची पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील गरोदर व स्तनदा मातांना 'प्रधान मंत्री मातृ वंदना योजने'चा लाभ मिळत नसल्याबाबत

**(२४) ५८३०८ (२८-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात माता व बालकांचे आरोग्य सुदृढ असावे तसेच त्यांचे मृत्यू रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासन यांच्या सहभागाने आरोग्य विभागामार्फत 'पंतप्रधान मातृ वंदना योजना' केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाअंतर्गत दिनांक ८ डिसेंबर ,२०१७ रोजी पासून राबविण्यात येत आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत केंद्र शासनाचा ६० टक्के तर राज्य शासनाचा ४० टक्के सहभाग असून पहिल्या अपत्यासाठी गरोदर मातांना ५,००० हजार रुपयांची आर्थिक मदत तीन टप्प्यात दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही योजना संपूर्ण देशात लागू करण्यात आली असून विशेषतः वसई (जि.पालघर) तालुक्यात माहे जून, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत नोंदणी केलेल्या बहुतांश गरोदर व स्तनदा मातांना या योजनेच्या आर्थिक लाभापासून वंचित ठेवण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात पैसे जमा करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेअंतर्गत माहे डिसेंबर, २०२२ ते जानेवारी, २०२३ पर्यंत किती लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले आहेत व त्याचा तपशील काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०६-२०२३) :**(१) (२) (३) हे खरे आहे.

(४) वसई तालुका व वसई-विरार महानगरपालिका अंतर्गत माहे डिसेंबर २०२२ पासुन ते जानेवारी २०२३ पर्यंत रक्कम रु.१,५४,८०,०००/- इतका निधी DBT (Direct Beneficiary Transfer) द्वारे थेट मातांच्या बँक खात्यामध्ये वितरीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घुग्घुस (जि.चंद्रपूर ) येथील ग्रामीण रुग्णालयात औषधसाठा उपलब्ध करण्याबाबत**

**(२५) ५८३५९ (२८-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात अनेक प्रकारची औषधे नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषधसाठा उपलब्ध नसल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, घुग्घुस येथील ग्रामीण रुग्णालयात औषधसाठा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही. दिनांक ०९ जून २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये घुग्घुस (जि.चंद्रपूर ) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर असून बांधकाम सुरु आहे. अद्याप ग्रामीण रुग्णालय सुरु झालेले नाही. सद्यःस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे.

(२) व (३) प्राथमिक आरोग्य केंद्र, घुग्घुस (जि.चंद्रपूर ) येथे आवश्यक असलेली औषधी व सामुग्री उपलब्ध आहे. जिल्हा स्तरावरुन जीवरक्षक औषधांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर व आरोग्य कर्मचारी उपस्थित राहत नसल्याबाबत**

**(२६) ५८५१५ (२८-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नादुर्डी (ता. निफाड,जि.नाशिक) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर व आरोग्य कर्मचारी उपस्थित राहत नसल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांनी जिल्हातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या असता ही बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी सुरगाणा तालुक्यातील पळसन व कळवण तालुक्यातील जयदर येथील डॉक्टर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित राहत नसल्याची तक्रार लेखी निवेदनाव्दारे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना दिनांक १ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामिण भागातील नागरिकांना चांगली आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी याकरिता शासन दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च करते मात्र आदिवासी बहुल तालुक्यात डॉक्टर व आरोग्य कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित राहत नसल्याने शासनाच्या मुळ उद्देश सफल होत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रात अनुपस्थित रहाण्या-या डॉक्टर व आरोग्य कर्मचा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) काही प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याचे आढळून आले, हे खरे आहे.
(३) तक्रार प्राप्त झालेली नाही
(४) हे खरे नाही
(५) गैरहजर राहणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेविरूद्ध कारवाई करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांना कमी क्षमतेचे व निकृष्ट दर्जाचे मोबाईल पुरविण्या-या पूरवठादारावर कारवाई करण्याबाबत

**(२७) ५८५६४ (२८-०४-२०२३):** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना गेल्या पाच वर्षांपासून देण्यात आलेले मोबाईल कमी क्षमतेचे व निकृष्ट असल्याने कर्मचाऱ्यांनी आंदोलनाद्वारे सदरचे मोबाईल प्रशासनाला माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान परत केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वॉरंटी व गॅरंटी संपलेल्या मोबाईल दूरध्वनी वरून ॲप मध्ये माहिती भरणे तसेच इतर कामे होत नसल्याने अंगणवाडी कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्या अनुषंगाने काय निष्पन्न झाले ,
(४) असल्यास, निकृष्ट दर्जाचे मोबाईल पुरविणाऱ्या पुरवठादरावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०६-०६-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.
केंद्र पुरस्कृत पोषण अभियानांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात १२०३३५ मोबाईल फोन खरेदी करण्यात आलेले आहेत. सदरचे मोबाईल फोन अंगणवाडी सेविका व इतर एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या स्पेसीफिकेशन नुसारच मोबाईल फोन पुरविण्यात आलेले आहेत. सबब पुरविण्यात आलेले मोबाईल फोन हे कमी क्षमतेचे व निकृष्ट दर्जाचे आहेत हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समितीमार्फत माहे ऑगस्ट २०२१ मध्ये राज्यभरात मोबाईल वापसी आंदोलन करण्यात आले होते. तथापी, त्यानंतर काही जिल्हयांमध्ये क्षेत्रीय स्तरावरुन संबधित अंगणवाडी सेविकांशी चर्चा करुन अंगणवाडी सेविकांनी मोबाईल वापसी आंदोलनामार्फत प्रकल्प कार्यालयात जमा केलेले मोबाईल फोन अंगणवाडी सेविकांनी पुनश्च ताब्यात घेतलेले आहेत.
(२), (३), (४) व (५) सन २०१८-१९ मध्ये अंगणवाडी सेविका, मुख्यसेविका, तसेच कंत्राटी तांत्रिक मनुष्यबळ यांना पुरविण्यात आलेल्या १२०३३५ मोबाईल फोनची वॉरंन्टी माहे मे-२०२१ मध्ये समाप्त झालेली आहे, असे असले तरी बहुतांशी स्मार्ट मोबाईल फोन सुरु असून पोषण ट्रॅकर ॲप डाऊनलोड करणे तसेच त्यावर आवश्यक ती माहिती अंगणवाडी सेविकांमार्फत भरण्यात येत आहे. सदर मोबाईल फोनमध्ये पोषण ट्रॅकर अँप सहजरित्या डाऊनलोड होत असून त्यामार्फत अंगणवाडीचे कामकाज व्यवस्थित सुरु आहे.

विभागाने अंगणवाडी सेविकांना पुरविलेले मोबाईल फोन या मार्फत सद्यस्थितीत साधारणतः ९९% लाभार्थ्यांची नोंद अंगणवाडी सेविकांमार्फत पोषण ट्रॅकर ॲप्लीकेशनवर घेण्यात आलेली आहे. तसेच ९०% लाभार्थ्यांचे आधार क्रमांक पडताळणी देखील पोषण ट्रॅकर ॲप्लीकेशनवर केलेली आहे. व उर्वरित लाभार्थ्यांचे आधार पडताळणीचे काम युध्द पातळीवर सुरु आहे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या मोबाईल फोनची वॉरंन्टी व गॅरन्टी समाप्त झालेली असल्याकारणाने व काही फोन नादुरुस्त असल्याकारणाने अंगणवाडी सेविका व इतर कर्मचाऱ्यांना नवीन स्मार्ट फोन उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

---

**राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत सेवा बजावणा-या आरोग्य सेविकांना सेवेतून कमी करण्यात येत असल्याबाबत**

**(२८) ५८७०२ (२८-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत गेली १२ वर्षे जिल्हयात सेवा बजावणाऱ्या २० आरोग्य सेविकांना सेवेतून कमी करण्यात येत असल्याने एनआरएचएम च्या आरोग्य सेविकांनी जिल्हपरिषदेसमोर माहे डिसेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदर आंदोलनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार आरोग्य सेविकांना सेवेतून कमी न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) केंद्रशासनाने दि.१९.०१.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविल्यानूसार पत्रकानूसार कंत्राटी ५९७ आरोग्य सेविकांना त्यांच्या मुळ जागी रूजु करून घेण्यात आले आहे.

(३) केंद्रशासनाने ५९७ आरोग्य सेविकांच्या पदांना मंजुरी दिली असल्याने कार्यमुक्त व इतर ठिकाणी समायोजित करण्यात आलेल्या आरोग्य सेविकांना मुळ जागी रूजू करून घ्यावे असे दि.२०.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हयांना कळवण्यात आले आहे. त्यानूसार सिंधुदुर्ग जिल्हयातील कार्यमुक्त करण्यात आलेल्या २० आरोग्य सेविका यांना दि.२३.०१.२०२३ रोजी मुळ जागी रूजू करून घेतलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) शहरात सद्यस्थितीत हजारो महिलांच्या प्रसूती घरीच होत असल्याबाबत.**

**(२९) ५८८२६ (२८-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरात सद्यस्थितीत हजारो महिलांच्या प्रसूती घरीच होत आसल्याचे वास्तव शासकीय आकडेवारीतून निदर्शनास आले असून माहे एप्रिल, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर आठ महिन्यांत ठाणे जिल्ह्यात १२३१, पालघर जिल्हयात १३० आणि रायगड जिल्हयामध्ये ४१ प्रसूती घरांमध्ये करण्यात आल्याची नोंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला गर्भवती झाल्यापासून प्रसूती होईपर्यंत किमान १२ वेळा तिची आरोग्य विभागाकडून तपासणी होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

IHIP HMIS पोर्टलनुसार माहे एप्रिल, २०२२ ते माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये ठाणे, पालघर व रायगड या जिल्हयांमध्ये तसेच भिवंडी शहरात घरी झालेल्या प्रसूतीची संख्या खालीलप्रमाणे

अ.क्र. ठिकाण घरी झालेल्या प्रसूती

१ ठाणे जिल्हा ११९९

२ पालघर जिल्हा १२४

३ रायगड जिल्हा ३८

४ भिवंडी शहर १०७२

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महिला गर्भवती झाल्यापासून प्रसूती होईपर्यंत किमान ४ वेळा तपासणी होणे आवश्यक आहे.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार गरोदरपणामध्ये गरोदरपणा दरम्यान किमान ४ वेळा मोफत तपासणी करण्यात येते. तसेच जोखमीच्या मातांचा तज्ञांमार्फत अतिरिक्त पाठपुरावा करण्यात येतो.

राज्यात दर महिन्याच्या ९ तारखेला प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान राबविण्यात येते. यामध्ये दुस-या व तिस-या तिमाहीतील गरोदर मातांची तपासणी वैद्यकिय अधिकारी /तज्ञांमार्फत करण्यात येते. तसेच प्रयोगशाळा तपासण्या व सोनोग्राफी तपासणी करण्यात येतात. जोखमीच्या माता शोधून उपचार व संदर्भसेवा देण्यात येतात. सर्व गरोदर मातांना प्रसूतीच्या तयारी विषयी तसेच कुटुंब नियोजनाबाबत समुपदेशन करण्यात येते.

यासह सर्व गरोदर महिलांची सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये तसेच आरोग्य सेवा सत्रांमध्ये तपासणी केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाडी सेविकांना पोषण आहाराची माहिती भरावयाचा पोषण ट्रॅकर ॲप मराठीत सुरु करण्याबाबत

**(३०) ५९४०० (२८-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी सेविकांना पोषण आहाराची सर्व माहिती भरण्यासाठी शासनाने माहे जानेवारी, २०२१ पासून पोषण ट्रॅकर ॲप सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ॲपमध्ये भरावयाची माहिती ही इंग्रजीमध्ये असल्याने अंगणवाडी कर्मचारी यांनी ती मराठीत करुन द्यावी आणि तोपर्यंत या ॲपमध्ये माहिती भरण्याची सक्ती करु नये अशी मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोषण टॅकर ॲप मराठीतून उपलब्ध करुन देण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र शासनाने दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी पर्यंत सादर करावी तसेच तो मराठीतून कसा चालतो याचे प्रात्यक्षित न्यायालयात दाखवावे असे स्पष्ट आदेश उच्च न्यायालयाने शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत:खरे आहे.

पोषण ट्रॅकर ॲप हे केंद्र शासनाने विकसीत केले असून, या ॲप वर लाभार्थ्यांचे नाव, जन्मतारीख, वजन, उंची, पोषण आहार पुरवठा, पूर्व शालेय शिक्षण दिल्याची आणि अंगणवाडी उघडल्याची इ.सर्व माहिती भरता येते. या ॲपमध्ये माहे सप्टेंबर, २०२२ पासून लाभार्थ्यांचे नाव व जन्मतारीख वगळून इतर सर्व माहिती मराठी माध्यमातून भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. आधार पडताळणीसाठी लाभार्थ्यांचे नाव व जन्मतारीख इंग्रजीमध्ये असणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर ॲपमध्ये सेविका / मदतनीस माहिती भरत असून, सदर ॲपमध्ये १०० % लाभार्थ्यांच्या नोंदी झाल्या आहेत व त्यापैकी ९०% लाभार्थ्यांची आधार पडताळणी करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

पोषण ट्रॅकर ॲप मराठीमध्ये उपलब्ध असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालयात सादर केले असून ॲप कसे चालते याबाबत प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी मा.उच्च न्यायालयात अंगणवाडी सेविका यांनी उपस्थित राहून ॲपचा डेमो देण्याची तयारी दर्शवली होती. परंतू मा. उच्च न्यायालयाने प्रत्यक्ष डेमो करुन दाखविणेबाबत सांगितले नाही, त्यामुळे प्रात्यक्षिक करुन दाखवता आले नाही. तथापि, मा.उच्च न्यायालयाने सरकारी वकीलामार्फत डेमोबाबतची सर्व माहिती घेतली.

(४) व (५) पोषण ट्रॅकर हे ॲप केंद्र शासनाने विकसित केले असून केंद्र शासनाने सदर ॲपमध्ये लाभार्थ्यांचे नाव व जन्म तारीख वगळून इतर सर्व माहिती मराठी भाषेतून भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार सर्व अंगणवाडी सेविका/मदतनीस या ॲपचा वापर करत आहेत. सदर ॲपमध्ये १०० % लाभार्थ्यांच्या नोंदी झाल्या आहेत व त्यापैकी ९०% लाभार्थ्यांची आधार पडताळणी करण्यात आलेली आहे. लाभार्थ्यांचे नाव देखील मराठी भाषेमधून भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी मध्ये बालकांना मध्यान भोजनाच्या आहारात दिली जाणारी मुगडाळ निकृष्ठ दर्जाची असल्याबाबत

**(३१) ५९९५८ (११-०५-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व अंगणवाडयांमध्ये बालकांना मध्यान भोजनाच्या आहारात दिली जाणारी मुगडाळ निकृष्ठ दर्जाची असल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदारामार्फत पूरविण्यात यणारे पदार्थ हे पोखरलेले व कुजलेल्या स्वरुपात असल्याने अंगणवाडीतील लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने यास जबाबदार असण्या-या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्हयात अंगणवाडीतील बालकांना देण्यात येणाऱ्या निकृष्ट मूगडाळीबाबत पुण्यनगरी दैनिक वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध झाली होती. यासंदर्भात चौकशी केली असता मुगडाळ निकृष्ट दर्जाची असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जागतिक कोरोना महामारी काळातील कोव्हिड-१९ योद्धयांना विमा संरक्षणाची आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(३२) ५९९६९ (२८-०४-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तत्कालीन राज्य शासनाने जागतिक कोरोना महामारी काळात अत्यावश्यक सेवेतील शासकीय कर्मचारी कर्तव्यावर असताना कोव्हिड आजाराने मृत पावल्यास त्यांच्या कुटंबीयांना मदत म्हणून 'कोव्हिड-१९ विमा संरक्षण' म्हणून सुमारे ५० लाख रुपयाची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वस्त्रपाल श्री.उद्धव शेषेराव दहिफळे हे कार्यरत असतांना त्यांचा कोरोना संक्रमण होऊन कर्तव्यावर असताना कोव्हिड आजाराने दिनांक १८ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यादरम्यान निधन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्या पत्नी श्रीमती दहिफळे यांनी शासनाने जाहीर केलेल्या कोव्हीड-१९ विमा संरक्षण योजनेतील आर्थिक मोबदला मिळावा यासाठी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेमार्फत संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांचे

कार्यालयाकडे दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास अर्ज केला असून शासनाने अद्यापही विम्याची रक्कम त्यांना दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने माहिती घेतली आहे काय व त्यानुषंगाने विम्याची आर्थिक मदत त्यांच्या कुटुंबियांना मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-०६-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.
(२),(३) व (४) श्री.उध्दव शेषराव दहिफ़ळे हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे वस्त्रपाल या पदावर कार्यरत होते. कर्तव्यावर असताना
दिनांक ०६.०८.२०२० रोजी त्यांचे कोव्हिड च्या संक्रमणाने निधन झाले आहे. श्री. दहिफ़ळे यांच्या वारसांना सानुग्रह अनुदान मिळण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना सादर करण्यात आला होता.
श्री. दहिफ़ळे हे सानुग्रह अनुदान मिळण्याबाबतच्या अटी पूर्ण करीत नसल्याने त्यांचा प्रस्ताव नाकारण्यात आला आहे. अशा प्रकारचे शासनास प्राप्त झालेले सर्व प्रस्ताव वित्त विभागाच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार
तपासून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सादर करण्याबाबत आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापूर( जि.अकोला) तालुक्यातील ग्रामीण भागातील**
**आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३३) ६०१६३ (०२-०५-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) तालुक्यातील ग्रामीण भागाशी सबंधीत असलेल्या आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकाऱ्यांसह ३८ पदे रिक्त असल्यामुळे तेथील नागरीकांना दर्जेदार आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तालुक्यातील पारस, उरळ, हातरूण व वाडेगाव या चार ठिकाणी असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत २३ उपकेंद्र स्थापित करण्यात आलेली असून या उपकेंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक व सहाय्यीका,आरोग्य सेवक व सेविका, औषधी संयोजक, कनिष्ठ सहाय्यक, परीचर, सफाई कामगार अशी एकूण १०६ पदे मंजूर असतांना केवळ ६९ पदे भरलेली असल्याने रिक्त पदांच्या ताण आरोग्य सेवेवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०६-२०२३) :**(१) अकोला जिल्हयाच्या बाळापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रासाठी गट अ ते गट ड संवर्गाची एकुण ११६ पदे मंजूर असून ९२ पदे भरलेली व २४ पदे रिक्त आहेत हे खरे आहे.
(२) बाळापूर तालुक्यातील पारस, उरळ, हातरुण व वाडेगाव या चार प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत २३ उपकेंद्रे कार्यान्वित आहेत. सदर उपकेंद्रात वैद्यकीय अधिकारी हे पद मंजुर नाही. सदर उपकेंद्रांसाठी समुदाय अधिकारी संवर्गाची २३ पदे मंजुर असुन त्यापैकी १६ पदे भरलेली व ७ पदे रिक्त आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या समुदाय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत.
(३) वैद्यकीय अधिकारी, गट अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## अहमदपूर (जि. लातूर) येथील ट्रामा केअर युनिट फेज दोन इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध होणेबाबत

**(३४) ६०२९२ (०२-०५-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर (जि. लातूर) येथे राष्ट्रीय राज्य महामार्गावर होणाऱ्या अपघातग्रस्तांना आपत्कालीन सेवा पुरविण्याच्यादृष्टीने दिनांक ८ मार्च, २००६ रोजी वा त्यासुमारास ट्रामा केअर मंजूर झाले असून काही तांत्रिक अडचणींमुळे सदरील ट्रॉमा केअर युनिट उदगीर येथे हलवण्यात आले असल्याने सदरील प्रकरण मा. न्यायालयात गेले असता तदनंतर दिनांक १७ मार्च,२००७ रोजी वा त्यासुमारास अहमदपूर येथे सदर ट्रामा केअर सेंटरला मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर मंजूरी मिळाल्यानंतर वर्ग २ कर्मचाऱ्यांची पद भरती झाली तथापि दहा वर्षानंतर म्हणजे सन २०१७ मध्ये सदर युनिटच्या पहिल्या फेज इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले व फेज २ इमारतीच्या बांधकामासाठी लागणारे तीन कोटी रुपये व आवश्यक यंत्र सामुग्रीसाठी लागणा-या निधी अभावी सदरील ट्रामा केअर युनिट अद्याप अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय स्तरावर नव्याने सर्व साधारण मंजुरीचे अंदाजपत्रक दिनांक २१ ऑगस्ट, २०२१ रोजी वा वा त्यासुमारास पाठवले तसेच वेळोवेळी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाठपूरावा करीत असूनही निधी उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(५ )असल्यास, अहमदपूर येथील ट्रामा केअर युनिट फेज दोन इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध होणेबाबाब शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०५-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

दि.८ मार्च, २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर झालेले अहमदपूर येथील ट्रामा केअर युनिट उपजिल्हा रुग्णालय, उदगीर येथे हलविण्यात आले होते. परंतू याबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण झाले नसून शासनाने शासन निर्णय दि.१७.०३.२००७ अन्वये पुन:श्च अहमदपूर येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यास मंजुरी दिलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दि.१७.०३.२००७ अन्वये अहमदपूर येथील ट्रामा केअर युनिट अंतर्गत मंजूर करण्यात आलेली पदे भरण्यात आली असून, पहिल्या टप्प्याचे बांधकाम दि.२२.१०.२०१७ रोजी पूर्ण करुन इमारत ताब्यात घेण्यात आलेली आहे. तसेच दुसऱ्या टप्प्याचे बांधकामासाठी आवश्यक निधी तसेच यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) अहमदपूर येथील ट्रामा केअर युनिट बांधकामाचे (टप्पा-२) रु.३४६.५१ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव शासनास आयुक्तालयाने दि.१४.०२.२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्ताव परिपूर्ण नसल्यान त्याबाबतची अधिकची माहिती मागविण्यात आली होती. सदर माहिती शासनास प्राप्त झालेली असून त्यानुषंगाने सदरहू बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करुन निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उजनी (ता.औसा,जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करणेबाबत

**(३५) ६०४२९ (०२-०५-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी (ता.औसा,जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून ग्रामीण रुग्णालयात रुपांतरीत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३ नोव्हेबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या जिल्हा नियोजन समिती, लातूर च्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१९-०५-२०२३) :**(१) होय.

(२) व (३) उजनी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे ग्रामीण रुग्णालय म्हणून दर्जोन्नत करण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप अप्राप्त असून सदरचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निकषानुसार तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साईसखी महिला बचत गट,उस्मनाबाद यांस घरपोच आहार (टीएचआर) संदर्भात नागरी प्रकल्पासाठीचे काम देण्याबाबत

**(३६) ६०६०२ (२८-०४-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागामार्फत घरपोच आहार (टीएचआर) संदर्भात नागरी प्रकल्पासाठी उस्मानाबाद जिल्हा परिषदे कडून १० महिला बचत गटासाठी निविदा प्रकाशित करण्यात आल्या असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये बचत गटाची निवड करताना बचत गट हा त्याच प्रभाग,वॉर्ड व गावातील असावा असे आदेशित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या निकषामध्ये नेहरु युवती व साईसखी बहुउद्देशीय सामाजिक महिला मंडळ, उस्मानाबाद हा बचत गट पात्र असतांना जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (श्री.निपाणीकर) यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन सदर बचत गटाचे नाव जाणिवपूर्वक वगळून बचत गटातील महिलांना मानसिक त्रास दिला तसेच उमरगा, मुरुम, तुळजापूर, परंडा, भूम व कळंब येथील महिला बचत गटांना आर्थिक देवाण घेवाण करुन कामाचे वाटप केल्याच्या तक्रारी सदर महिला बचत गटाने दिनांक २३ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी झालेल्या अन्यायाबाबत जिल्हा महिला बचत गट, महासंघ, उस्मानाबाद यांचेवतीने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद,मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परीषद.उस्मानाबाद, आयुक्त, एकात्मिक बालविकास प्रकल्प,मुंबई यांना निवेदने देऊन न्याय देण्याची मागणी केली असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने त्याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार साईसखी महिला बचत गटाला कामाचे वाटप करण्यात आले आहे काय, असल्यास केव्हा, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यातील १० ग्रामीण प्रकल्पांकरीता व १ नागरी प्रकल्पामधील अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) पुरवठा करण्यासाठी डिसेंबर, २०२१ मध्ये निविदा प्रकाशित करण्यात आलेली होती.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण प्रकल्पातील अंगणवाड्यांमधील लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) पुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायत किंवा ग्रुप ऑफ ग्रामपंचायत क्षेत्रनिहाय निविदा प्रकाशित करण्यात आलेली होती आणि नागरी प्रकल्पातील अंगणवाड्यांमधील लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) पुरवठा करण्यासाठी प्रकल्प निहाय निविदा प्रकाशित करण्यात आलेली होती, तसेच नागरी प्रकल्पांकरीता अर्ज करणारे महिला मंडळ/ महिला बचत गट मधील सभासद हे प्रकल्प कार्यक्षेत्राचे रहिवासी असणे आवश्यक आहे तसेच सदर महिला मंडळ/ महिला बचत गटाचे किचन हे सदर प्रकल्प कार्यक्षेत्रात असणे आवश्यक आहे.

(३) हे खरे नाही.

नेहरु युवती व साई सखी बहुउद्देशिय सामाजिक महिला मंडळ उस्मानाबाद या दोन्ही संस्थांनी निविदा अटी शर्तींची पुर्तता केल्याने सदर दोन्ही संस्थांना नियमानुसार काम मंजूर करण्यात आलेले आहे. तसेच सदर दोन्ही संस्थांचे आहार पुरवठ्याचे काम आजरोजी सुरु आहे. उस्मानाबाद निविदा प्रक्रियेसंदर्भात श्रीमती मनिषा शिवाजी पाटील आणि श्रीमती मंजुषा रमेश खळदकर यांनी तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीचा अर्ज चौकशीकरीता विभागीय उप आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) सदर प्रकरणी तक्रारीचा अर्ज चौकशीकरीता विभागीय उप आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) साई सखी बचत गटाला मार्च, २०२० पासून कामाचे वाटप करण्यात आले आहे व त्यांचे काम आजतागायत सुरु आहे.

---

## अंगणवाडी सेविका, मदतनिसांन यांना सेवानिवृत्तीचा लाभ मिळण्याचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३७) ६०६६७ (२८-०४-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी सेविका, मदतनियांना सेवानिवृत्तीचा लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला परंतु जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातून सेवा दिलेल्या अंगणवाडी सेविका, मदतनिस यांना सन २०१४ पासून अद्यापपर्यंत सेवानिवृत्तीच्या लाभ मिळाला नसल्याचे निदर्शनास आले असून सध्या जिल्हा परिषदेतून मुंबई येथील महिला व बालकल्याण विभागाच्या आयुक्त कार्यालयात ३९० प्रस्ताव अद्यापपर्यंत प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) तसेच, चाळीसगाव (जि.जळगांव) येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत प्रकल्प १ व २ अंगणवाडी सेविका व मदतनिस यांची सेवापूर्ती नंतर मिळणारी एक रक्कमी एक लक्ष रुपये लाभाचे एकूण ८७ लाभार्थ्यांचे एकूण ८७ लक्ष रुपये अद्यापही अप्राप्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सेवानिवृत्तीनंतर अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका यांना एल.आय.सी. योजनेअंतर्गत एकरक्कमी रुपये १ लाख किंवा ७५ हजार रक्कमेचा लाभ शासन निर्णय क्र. एबावि-२०१३/प्र.क्र. १४१/का-६, दिनांक ३०.०४.२०१३ नुसार जाहिर केला तथापि एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांचेकडून अशा लाभार्थींचे एकूण ६१ प्रस्ताव सादर करण्यात आले असून त्यापैकी ४४ कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला परंतु उर्वरित १७ कर्मचाऱ्यांना सन २०१६ पासून आजपर्यंत सेवानिवृत्ती एकरक्कमीचा लाभ मिळालेला नसून त्या उर्वरित १७ कर्मचाऱ्यांपैकी ५ कर्मचारी मयत झाले असून त्यांचे वारसांना आजतागायत या योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०६-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
सदर योजना सुरु झाल्यापासून बाल विकास प्रकल्प चाळीसगाव क्र.१ व २ या प्रकल्पातील एकूण १३३ पैकी ४२ अंगणवाडी कर्मचा-यांना लाभ मिळाला आहे. उर्वरीत अंगणवाडी कर्मचा-यांचे एकूण ९१ प्रस्ताव आयुक्तालयामार्फत लाभ प्रदानासाठी एल.आय.सी कार्यालय, पुणे येथे पाठवण्यात आले आहेत. सदर प्रस्तावांबाबत एल.आय.सी मार्फत लाभ प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) अंश:त खरे आहे.
१७ अंगणवाडी कर्मचा-यांपैकी ८ प्रस्तावांना लाभ प्रदान करण्यात आला आहे. उर्वरित ९ अंगणवाडी कर्मचा-यांचे प्रस्ताव एकरकमी लाभ प्रदान करण्यासाठी एल.आय.सी कार्यलयाकडे पाठविण्यात आले असून त्याबाबतची कार्यावाही एल.आय.सी कार्यालयामार्फत सुरु आहे.
(४) व (५) राज्यात अंगणवाडी कर्मचा-यांचे दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत एकरकमी लाभाचे प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याकरिता रुपये १००.०० कोटी एवढी रक्कम शासन निर्णय ३० मार्च, २०२२ अन्वये एल.आय.सी, पुणे यांना अदा करण्यात आलेली आहे.

---

## अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांवर वैद्यकीय अधिकाऱ्यांसह इतर कर्मचारी उपस्थित राहत नसल्याबाबत

**(३८) ६०९०० (०२-०५-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांवर वैद्यकीय अधिकारी, परिचारिका (नर्सेस), वॉर्डबॉय व इतर कर्मचारी पूर्णवेळ उपस्थित रहात नसल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी त्या त्या ग्रामंपचायत प्रशासनाकडे तसेंच स्थानिक लोकप्रतिनिधींकडे वारंवार केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचारी यांच्या अनुपस्थितीमुळे ग्रामस्थांना आरोग्य सेवा सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचेही मागील अनेक महिन्यांपासून निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन जनतेच्या आरोग्य सुविधांसाठी करोडो रुपये खर्च करीत असून देखिल नागारिकांना आरोग्य सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागल्याने यास जबाबदार असण्या-या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०६-२०२३) :**(१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आंतरधर्मीय विवाह समिती कडे प्राप्त तक्रारी वर कार्यवाही करण्याबाबत

**(३९) ६१२४२ (२८-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने स्थापन केलेल्या आंतरधर्मीय विवाह समन्वय समितीकडे माहे जानेवारी, २०२३ अखेर १५३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,प्राप्त तक्रारींचे स्वरूप काय आहे,
(३)असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (३०-०६-२०२३) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागरी भागातील अंगणवाडी केंद्रांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सेवासुविधा देण्याबाबत**

**(४०) ६१५३८ (२८-०४-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरी भागातील अंगणवाडी केंद्रांना स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सेवासुविधा घेता याव्यात यासाठी राज्यातील नागरी भागात येणाऱ्या सर्व अंगणवाडयांचे समायोजन जवळच्या नागरी प्रकल्पात करुन घेण्याचा निर्णय शासनाने माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडय़ांचे समायोजन झाल्यास त्यांना लागणाऱ्या पाणी, वीज,शौचालय, इमारत बांधकाम अथवा दुरुस्ती, शैक्षणिक साहित्य या सुविधा महानगरपालिकेकडून दिल्या जाणार आहेत. हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, ठाणे जिल्हयातील वसई, विरार महानगरपालिका व मिराभाईंदर या परिसरात जिल्हापरिषदेच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत प्रकल्प १, प्रकल्प २ आणि मिराभाईंदर प्रकल्प असे प्रकल्प चालविले जात असून यात प्रकल्प १ मध्ये १७५ व प्रकल्प २ मध्ये ९० अंगणवाडया व मिराभाईंदर प्रकल्पात १३२ अंगणवाडया या नागरी प्रकल्पात म्हणजेच महानगरपालिका क्षेत्रात येत असून यांना सुविधा महानगरपालिकेकडून दिल्या जाणार आहेत काय,
(४) तसेच, सध्या समायोजन प्रक्रिया प्रलंबित असल्याने या अंगणवाडयांना सोयी सुविधा देता येत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, समायोजनाची प्रक्रिया पूर्ण करुन या अंगणवाडयांना सोयीसुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०६-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२), (३), (४), (५) व (६) नगर विकास विभागाचे शासन निर्णय दिनांक २९ मार्च, २०२२ अन्वये महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायती यामध्ये वार्षिक एकूण उत्पन्नापैकी निव्वळ महसूलातील ५ % रक्कमेमधून राबवावयाच्या महिला व बाल कल्याणासाठीच्या योजना व त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामध्ये नागरी भागातील अंगणवाडी केंद्र बांधकाम करणे तसेच अंगणवाडी केंद्रामध्ये इतर सोयी सुविधा पुरविण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार या अंगणवाड्यांना सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत.

---

**विहामांडवा (ता.पैठण,जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया शिबिराच्या वेळी महिला रुग्णांची झालेली गैरसोय**

**(४१) ६१५६७ (०२-०५-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विहामांडवा (ता.पैठण,जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया

शिबिराच्या वेळी महिला रुग्णांची गैरसोय झाल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणाची आरोग्य उपसंचालक यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दिनांक १ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शिबिरातील चार लाभार्थी महिलांशी चर्चा करून परिस्थितीची माहिती घेऊन , तसेच ग्रामस्थांशीही संवाद साधून चौकशी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर प्रकरणाचा अहवाल अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडून आरोग्य उपसंचालक यांना प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी दोषी असलेल्या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) सदर शिबिराच्या बातमीच्या अनुषंगाने अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केलेल्या चौकशी नंतर सादर केलेल्या अहवालानुसार सदर शिबिरामध्ये एकुण ९४ लाभार्थ्यावर बिनटाका कुंटुंब कल्याण शस्त्रक्रिया कोणत्याही प्रकारची गुंतागुंत न होता पार पाडण्यात आली. सदरील शिबिरानंतर शिबिरातील कोणत्याही लाभार्थी व त्यांचे नातेवाईकांकडुन तोंडी अथवा लेखी तक्रार प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदरील बातमीमधील आरोपांमध्ये तथ्य आढळून येत नसल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले आहे. तथापि जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा चिकित्सक, तालुका वैदयकिय अधिकारी आणि मनपा वैदयकिय अधिकारी यांना यापुढे भविष्यात शिबिरामध्ये कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही व त्याचे नियोजन लाभार्थी संख्येनुसार करण्यात यावे, याबाबत उपसंचालक यांच्याकडुन सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली (जि.रत्नागिरी) येथिल उपजिल्हा रूग्णालयातील रीक्त पदे भरण्याबाबत**

**(४२) ६१८६८ (०२-०५-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)दापोली (जि.रत्नागिरी) येथिल उपजिल्हा रूग्णालयात केवळ एकच वैदयकीय अधिकारी कायमस्वरूपी कार्यरत असल्याने रूग्णांची खूप गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, रूग्णालयातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत यासाठी दापोली तालुक्यातील पत्रकारांनी दिनांक २६ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास रूग्णालयासमोर उपोषण केले, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, सदर उपोषणाची दखल घेवून रूग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची त्याची कारणे काय?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे
उपजिल्हा रुग्णालय दापोली, जिल्हा रत्नागिरी हे ५० खाटांचे रुग्णालय असून तेथे वैदयकिय अधिक्षक वर्ग-१ चे ०१ पद मंजूर असून ते पद बदलीमुळे दि. ०४/०२/२०२२ पासून रिक्त असल्यामुळे सदर रुग्णालयातील नियमित वैदयकिय अधिकारी गट-अ (वर्ग-२) यांचेकडे वैदयकिय अधिक्षक पदाचा प्रभारी कार्यभार देऊन रुग्णालयीन कामकाज सुरु आहे.
सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, गट-अ (वर्ग- २) संवर्गाची एकूण ७ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली व ४ पदे रिक्त आहेत. सदर भरलेल्या ३ पदांपैकी २ पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी कार्यरत असुन व १ पदावर तदर्थ वैद्यकीय अधिकारी कंत्राटी स्वरुपात ११ महिन्याकरीता कार्यरत आहे. उक्त नियमित २ वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी १ वैद्यकीय अधिकारी हे उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर यांचे आदेशान्वये दि. ८-५-२०२० पासून उपजिल्हा रुग्णालय कळंबणी खेड येथे कार्यरत असून उपजिल्हा रुग्णालय दापोली येथे आठवडयातील दोन दिवस स्त्रीरोग तज्ञाचे कामकाज पाहतात. त्याव्यतीरिक्त आयुष अंतर्गत ०१, आयपीएचएस अंतर्गत ०१ स्त्रीरोग तज्ञ व आरबीएसके अंतर्गत ६ वैदयकिय अधिकारी असे एकुण ८ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून रुग्णांना सेवा देत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे..

उपजिल्हा रुग्णालय दापोली येथील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी यासाठी दापोली तालुक्यातील पत्रकारांनी दि. २६/०१/२०२३ पासुन दापोली उपजिल्हा रुग्णालयासमोर आमरण उपोषणास बसणार असल्याचे कळविले होते. तथापि, सदरचे उपोषण त्यांनी स्थगित केले आहे.

(३) वैद्यकीय अधिकारी, गट अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रातील कंत्राटी वाहन चालकांना सेवेत कायम करण्याबाबत

**(४३) ६१८८९ (०२-०५-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत १०२ रुग्णवाहीकांवर कंत्राटदारामार्फत नेमलेल्या एकूण ६७ कंत्राटी वाहनचालक कमी मानधनावर गेली १८ वर्षे सेवा करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या वाहनचालकांनी कोरोनाच्या संसर्गाच्या काळात देखील कोरोना पॉझिटिव्ह व इतर अत्यावश्यक रुग्णांना दवाखान्यात सोडण्याचे तसेच गावोगावी जाऊन रुग्णांना वैद्यकीय तपासणी करण्यासाठी तसेच कोव्हीड-१९ लसिकरणासाठी सेवा दिली आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेळोवेळी वाढ करण्यात येणाऱ्या भत्त्यानुसार मानधन अदा करणे सेवापुरवठादाराला बंधनकारक असुन देखिल त्यांना किमान वेतनतत्त्वावर मानधन अदा करण्यात येत नसल्याने त्यानी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल करुन नियमित वेतनश्रेणीतील किमान ग्रेड, सेवेत कायम करा अशी मागणी केली आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर मा.उच्च न्यायालय यांनी नियमित आस्थापनेवरील वाहनचालकांना ज्या प्रमाणे नियमित वेतनश्रेणीत पगार दिला जातो त्यामधील किमान ग्रेड हा मजूरी (Wages) म्हणून याचिकेच्या दिनांकापासून व आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत अदा करण्यात यावा असा आदेश पारित केलेला आहे मात्र त्याची अंमलबजावणी संबंधित प्रशासनाकडून झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या कंत्राटी कामगारांना विना शर्ती व अट सेवेत सामावून घेणे तसेच समान काम समान वेतन या न्याय तत्त्वावर नियमित आस्थापनेवरील वाहनचालकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१२-०६-२०२३) :**(१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी अधिनस्त प्राथमिक आरोग्य आरोग्य केंद्रातंर्गत १०२ रुग्णवाहिकांवर बाहययंत्रणेद्वारे नियुक्त ६७ कंत्राटी वाहन चालक कार्यरत असून त्यांना प्रतिमहा रु. १९९००/- मानधन अदा करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पूणे ) येथे जन्मजात बालकांमध्ये हृदयविकारांचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(४४) ६२१५४ (०२-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे ) येथे जन्मजात बालकांमध्ये हृदयविकारांचे प्रमाण वाढत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ जानेवारी २०२३ अखेर एकूण किती बालकांना हृदयविकार झाल्याचे आढळून आले तसेच ह्या आजाराची लागण होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व त्याचा तपशील काय आहे,

(३)असल्यास, या आजाराने ग्रस्त बालकांवर कोणत्या स्वरूपाचे उपचार करण्यात आले,

(४) असल्यास,या आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून कोणत्या स्वरुपाची प्रतिबंधात्मक उपापयोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१५-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या अहवालानूसार सन २०१८-१९ मध्ये २७ बालके, सन २०१९-२० मध्ये १८ बालके व सन २०२२-२३ मध्ये २४ बालके हृदय विकार असल्याचे आढळून आले. हा विकार उपजत असून जन्मजात बालकांमध्ये आढळून येतो. असामान्य गुणसुत्रांची रचना, मातेचे गर्भावस्थेतील आजार उदा. मधुमेह, जंतूसंसर्ग इ. या आजाराची सर्वसाधारण कारणे आहेत.

(३) राष्ट्रीय बाल स्वाथ्य कार्यक्रमाच्या पथकांमार्फत शोधलेल्या संशयित बालकांवर तज्ञामार्फत तपासणी करून हृदय विकाराचे निदान केले जाते. यातील ज्या बालकांना शस्त्रक्रियेची गरज आहे, अशा बालकांवर हृदय शस्त्रक्रिया करण्यात येतात व ज्या बालकांना औषधोपचाराची गरज आहे अशा बालकांना औषधोपचार दिले जातात.

(४) महाराष्ट्र शासनाने यासाठी गरोदर मातांकरिता मोफत सोनोग्राफी सुविधा, मधुमेह तपासणी व त्यावरील उपचार, गरोदर मातेची ४ वेळा विशेषतज्ञामार्फत तपासणी तसेच इतर काही आजार आढळल्यास त्यावर उपचार उपलब्ध करून देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माजलगाव (जि.बीड) येथिल ग्रामीण रूग्णालयात नियमित बालरोगतज्ञ नसल्याबाबत

**(४५) ६२१९२ (०२-०५-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) येथिल ग्रामीण रूग्णालयात नियमित बालरोगतज्ञ नसल्याने कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेले डॉक्टर सराफ हे रूग्णालयात सतत अनुपस्थितीत राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, बालरोगतज्ञा शिवाय महिलांची प्रसूती करता येत नसुन सदर ग्रामीण रूग्णालयात बालरोगतज्ञा शिवाय प्रसूती करण्यात आलेल्या आहेत काय,

(३)असल्यास, सदर रूग्णालयातील कंत्राटी बालरोगतज्ञाविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०६-२०२३) :**(१) ग्रामीण रूग्णालय, माजलगाव येथे नियमित बालरोगतज्ञाचे पद रिक्त असल्यामुळे दि. १७.१२.२०२२ पासून आय.पी.एच.एस. अंतर्गत कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात आलेले वैद्यकीय अधिकारी दि. २०.१२.२०२२ ते दि. १७.०२.२०२३ या कालावधीत अनुपस्थित होते. ते दि. १८.०२.२०२३ पासून रूजू होऊन कार्यरत आहेत.

(२) ग्रामीण रूग्णालय, माजलगाव येथे २ नियमित वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून १ वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. एम.डी. (चेस्ट) असून दुसरे वैद्यकीय अधिकारी स्त्रीरोगतज्ञ आहेत. सदर वैद्यकीय अधिकारी यांचे सहाय्याने प्रसुती करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे.

(३) सदर रूग्णालयातील कंत्राटी बालरोगतज्ञ यांना त्यांचे अनुपस्थिती कालावधीचे मानधन देण्यात आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राळेगाव,कळंब , बाभुळगाव, वणी, मारेगांव, झरीजामणी व मारेगांव (जि.यवतमाळ) तालुक्यातील अंगणवाडीतील सेविका व मदतनिसांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४६) ६२१९८ (२८-०४-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव, कळंब व बाभुळगाव, वणी, मारेगांव, झरीजामणी व मारेगांव (जि.यवतमाळ) हे तालुके आदिवासी बहुल असून येथील अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविका व मदतनिसांची अनेक पदे रिक्त असल्याचे दिनांक ११ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,रिक्त पदामुळे अनेक ठिकाणी लहान मुलांना पोषण आहार वाटप करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुक्यातील अधिकारी यांनी अंगणवाडीतील रिक्त पदाचा अहवाल जिल्हयाला पाठविण्यात आला आहे काय,तसेच,काही ठिकाणी पदे भरण्याबाबत. जाहीरात काढल्या परंतू रिक्त पदे भरण्यात आली नाहित,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार रिक्त पदे कधी पर्यत भरण्याबाबत विभागाला सुचना केल्या आहेत ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०६-०६-२०२३) :**(१) अशंत: खरे आहे जानेवारी २०२३ अखेर राळेगाव, कळंब व बाभुळगांव, वणी, मारेगाव, झरीजामणी या तालुक्यातील खालील प्रमाणे पदे रिक्त आहेत.

| तालुक्याचे नाव | सेविका | सेविका | सेविका | मदतनीस | मदतनीस | मदतनीस | मिनी अंगणवाडी सेविका | मिनी अंगणवाडी सेविका | मिनी अंगणवाडी सेविका |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
| राळेगांव | १५८ | १४४ | १४ | १५८ | १२२ | ३६ | २६ | २६ | ० |
| कळंब | १३१ | १११ | २० | १३१ | ९७ | ३४ | १८ | १७ | १ |
| बाभुळगांव | १०२ | ९८ | ४ | १०२ | ७७ | २५ | १८ | १८ | ० |
| मारेगांव | १११ | १०२ | ९ | १११ | ९३ | १८ | ३० | २९ | १ |
| झरी | १०६ | ९३ | १३ | १०६ | ७८ | २८ | ३५ | ३४ | १ |
| वणी | १७४ | १४७ | २७ | १७४ | ११६ | ५८ | १३ | १३ | ० |

(२) सदर रिक्त पदे असल्यामुळे लहान बालकांना पोषण आहार व इतर सुविधा मिळण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेऊन लगतच्या अंगणवाडी सेविकाकडे सदर अंगणवाडी केंद्रांचा प्रभार देण्यात आले असून नियमित कामकाज सुरळीत सुरु आहे.

(३) व (४) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांची मंजूर पदसंख्येच्या मर्यादेत रिक्त असलेली सर्व पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ९.१.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाडया इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) ६२६९१ (२८-०४-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत शहरी व ग्रामीण भागात अंगणवाड्या चालवल्या जात असून बालकांच्या मानसिक व शारीरिक विकासाचा पाया मजबुत करणे, गर्भवती महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे बालकांचे लसीकरण करणेसह इतर कामे यांच्यामार्फत केले जाते, हे खर आहे काय,

(२) असल्यास, बीड व शिरुर कासार (जि.बीड) या दोन तालुक्यात असलेल्या एकूण ३७८ अंगणवाड्यांपैकी स्वत:च्या मालकीच्या इमारती असलेल्या २११ अंगडवाडया असून १६७ अंगणवाड्यांना स्वमालकीची इमारत नसल्यामुळे त्या भाडयाच्या जागेत वा अन्य ठिकाणी भरविण्यात येत असल्याचे दिनांक ८ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनस आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, अंगणवाडीसाठी स्वत:च्या मालकीची इमारत बांधण्यात याव्यात व त्यासाठी शासनाने आवश्यक तो निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी शासनाकडे आजतागायत वारंवार केली परंतु याबाबत शासन स्तरावरुन कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सातारा जिल्ह्यामध्ये १४५२ अंगणवाड्यांना इमारती नसल्याने त्या खाजगी जागा, समाजमंदिरे, सभागृह, ग्रामपंचायतीच्या जागेमध्ये भरवल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, ठाणे जिल्ह्यात सुमारे ३४६० अंगणवाड्यांपैकी केवळ १०८६ अंगणवाड्या स्वामालकीच्या जागेत भरत असून तब्बल २३७४ अंगणवाड्या आद्यापी खजगी जागेत, समाज मंदिर, सार्वजनिक हॉल किंवा कधी कधी झाडा खाली भरविण्यात वेळ अंगणवाडी सेविकावर येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सांगली जिल्हा व बीड व शिरुर कासार तालुका तसेच ठाणेसह राज्यातील अंगणवाड्यांना स्वमालकीच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०६-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) कार्यवाही झाली नाही अशी बाब नाही. शासन निर्णय दिनांक ३१.१.२०२२ नुसार महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण ) अंतर्गत ३ % इतका निधी कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यामध्ये अंगणवाडी केंद्रांचे बांधकाम करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार बीड जिल्हयामध्ये अंगणवाडी इमारत बांधकामासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता एकूण १५ कोटी एवढा निधी मंजूर झालेला आहे. त्यामधून जिल्हयातील १३३ अंगणवाडी केंद्र बाधकांम करण्यात येणार आहे.

(४) हे खरे आहे.

(५) ठाणे जिल्हयामधील ३७४८ अंगणवाडयांपैकी ११२४- अंगणवाडया स्वत:च्या इमारतीमध्ये असून उर्वरित अंगणवाडया शाळांमध्ये, समाज मंदिर, इतर सार्वजनिक ठिकाणी व भाडयाच्या इमारतीमध्ये भरविण्यात येत आहेत. ठाणे जिल्ह्यातील कुठलेही अंगणवाडी केंद्र झाडाखाली भरत नाही.

(६) शासन निर्णय दिनांक ३१.१.२०२२ नुसार महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३ % इतका निधी कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यामध्ये अंगणवाडी केंद्रांचे इमारत बांधकामही समाविष्ट आहे.

---

**अमरावती जिल्ह्यातील इर्विन हॉस्पिटला भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय असे नामकरण करणे बाबत**

**(४८) ६२६९४ (०२-०५-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील इर्विन हॉस्पिटल या नावाने प्रसिद्ध असलेले जिल्हा सामान्य रुग्णालयाला भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय असे नामकरण करणे तसेच इतर जिल्हा रुग्णालयाला नामकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी, अमरावती यांना स्थानिक लोक्रतिनिधी यांनी पत्र देऊन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत सूचना केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांचेपत्र क्रमांक २६९/२०२३ दिनांक २३/११/२०२२ रोजीजी जिल्हा शल्यचिकित्सक, अमरावती यांना पत्र देऊन लोकप्रतिनिधी यांच्या मागणीप्रमाणे प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत कळविले होते, हे खरे आहे काय,

(३)असल्यास, जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाने प्रस्ताव शासनाकडे पाठवून शासनाने याबाबत निर्णय घेतला आहे काय,.

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०५-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१२/ प्र.क्र.१९२/१२ आरोग्य-३अ दिनांक १ जून, २०१२ नुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्था व इतर मालमत्तेला महापुरुषांचे नाव न देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अंगणवाड्यांची सद्यस्थिती**

**(४९) ६३०९३ (२८-०४-२०२३). श्री.शंकरराव गडाख (नेवासा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाड्या, मिनी अंगणवाड्या व त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या सेविका व मदतनिसांची संख्या किती आहे,

(२) तसेच,अंगणवाडी सेविकांवर सोपवलेल्या जबाबदाऱ्यांचा तपशील काय आहे,

(३) तसेच, सेविका व मदतनिस यांना देण्यात येत असलेले वेतन व भत्ते किती आहेत,

४) तसेच,अंगणवाडी व मिनी अंगणवाड्यांसाठी वापरात असणाऱ्या वर्ग खोल्यांची माहीती व त्यात शिक्षण घेणाऱ्या बालकांची संख्या किती आहे?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०३-०७-२०२३) :** (१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यात १०४ नागरी व ४४९ ग्रामीण असे एकूण ५५३ प्रकल्प असून त्याअंतर्गत ९७४७५ अंगणवाडी केंद्र कार्यान्वित आहेत. त्यामध्ये ९३५१३ अंगणवाडी सेविका व ८०९०२ अंगणवाडी मदतनीस कार्यरत आहेत. तसेच, या प्रकल्पांतर्गत १२९७१ मिनी अंगणवाडी केंद्र कार्यान्वित असून त्यामध्ये १२२३६ मिनी अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत.

(२) अंगणवाडी सेविकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत:-

१) ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना पुरक पोषण आहाराचे वाटप करणे.

२) ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना अंगणवाडी केंद्रात पूर्व शालेय शिक्षण देणे.

३) लाभार्थ्यांच्या आरोग्य तपासणीकरिता आरोग्य विभागाला मदत करणे.

४) आहार व आरोग्याचे मातांना शिक्षण देणे.
५) अंगणवाडीतील दस्तऐवज अद्ययावत ठेवणे.
६) समुदायाशी संपर्क ठेवणे.
(३) अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना देण्यात येत असलेल्या मानधनाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| **पदनाम** | **एकूण मासिक मानधन** |
|---|---|
| अंगणवाडी सेविका | १०००० |
| मिनी अंगणवाडी सेविका | ७२०० |
| अंगणवाडी मदतनीस | ५५०० |

याशिवाय अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना सेवाज्येष्ठतेनुसार मानधनामध्ये वाढ अनुज्ञेय आहे.

(४) राज्यात एकूण १,१०,४४६ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून त्यापैकी ७१,२२४ अंगणवाडी केंद्र ही स्वमालकीच्या इमारतीत कार्यान्वित आहेत. उर्वरित ८१९३- अंगणवाडी केंद्र ही शाळांच्या इमारतीत असलेल्या वर्ग खोल्यांमध्ये, ९०६०- अंगणवाडी केंद्र ही समुदाय / पंचायत यांच्या इमारतीमध्ये, २१९६९- अंगणवाडी केंद्र भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यान्वित आहेत. सद्यस्थितीत, राज्यातील एकूण कार्यरत १,१०,४४६ अंगणवाडी केंद्रांमध्ये २७,४३,२६० बालके पूर्व शालेय शिक्षण घेत आहेत.

---

## परतूर (जि.जालना ) येथिल रुग्णालयास उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत

**(५०) ६३१६७ (०२-०५-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतूर (जि.जालना ) हे ६० हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेले शहर असून येथे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय आवश्यक असून मागील आठ ते दहा वर्षांपासून याबाबत मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील ग्रामीण रुग्णालयास किती दिवसांमध्ये उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव शासनानकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील प्रस्तावामध्ये मंजुरीसाठी कुठल्या अडचणी येत आहेत,
(५) असल्यास, परतुर शहर व ग्रामीण भागातील लोकसंख्येची घनता पाहता उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (०१-०६-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) परतूर (जि.जालना) येथील ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास दि.२७.०५.२०१५ रोजी प्रथम सादर करण्यात आला होता. तद्नंतर सुधारित प्रस्ताव दि.२०.०९.२०१९ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला. दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.०८.१२.२०२१ च्या पत्रान्वये सदरहू रुग्णालयाचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबत विनंती केली असून त्यानुषंगाने प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित राज्याचा बृहत आराखडाच्या प्रस्ताव सादर करताना ज्या बाबींचा अवलंब करण्यात आला होता त्या सर्व बाबीचा अवलंब करुन सन २०११ च्या लोकसंख्येनुसार राज्याचा बृहत आराखडयाचे काम सुरु आहे. त्यानुसार सन २०११ चा राज्याचा जोडबृहत आराखडा तयार करण्यासाठी MRSAC या संस्थेची नेमणूक करण्यात आली असून राज्यातील आरोग्य संस्थाचे मॅपिंगचे जवळपास काम पूर्ण झाले असून

प्रमाणीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. लोकसंख्या व अंतराच्या निकषानुसार नवीन संस्थांचे स्थान निश्चिती करण्यात येवून त्या संस्था सन २०११ च्या बृहत आराखडयात समाविष्ट करण्याबाबतची कार्यवाही आयुक्तस्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.